OPC

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2022-23)/ ०६ / of 2022**

## परिपत्रक:

विषयः— **मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचा प्रचार व संवर्धन करण्यासाठी, मराठी वाचन संस्कृती वृध्दीगत करण्यासाठी दरवर्षी आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम तसेच मराठी भाषेचा कामकाजात वापर होतो किंवा कसे यासाठी मराठी भाषा अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अवगत करण्याबाबत.**

संदर्भः— महाराष्ट्र विधानसभा यांचे क्र. ७२३१/म.वि.स./३१७/म.मा.स दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, मराठी भाषा समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकित खालील मुद्दयांची माहिती मागविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

मुद्दा क्र १:— आपली मातृभाषा मराठीचे वैभव जपणे, तिचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन करणे, मराठी साहित्य वाचनाची आवड वृध्दींगत करणे यासाठी शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/ निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, शासकीय संस्था/मंडळे, सार्वजनिक उपक्रम, महाविद्यालये/शाळा इत्यादी कार्यालयांनी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत शासनस्तरावरून दरवर्षी परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात येतात.

उपरोक्त बाबतीत महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणा—या कार्यक्रमांमध्ये मराठी भाषा जतन, प्रचार, प्रसार व संवर्धनासाठी कोणकोणत्या नाविण्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन केले गेले/ करण्यात येते, कोणकोणत्या तज्ज्ञ विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते/करण्यात येते व या कार्यक्रमासाठी स्थानिक सन्मा. लोकप्रतीनिधींना आमंत्रित करण्यात आले होते/करण्यात येते इ. सर्व तपशिलवार माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात यावेत. "

मुद्दा क्र २:— महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ कलम ५ ब (१) मध्ये पुढील तरतूद नमूद आहे "राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, या

अधिनियमान्वये त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, सुयोग्य अधिका—यास "मराठी भाषा अधिकारी" म्हणून पदनिर्देशिक करील"

या तरतूदीनुसार पदनिर्देशित करण्यात आलेल्या "मराठी भाषा अधिकारी" यांची नावे, पदनामे, नियुक्तीचा दिनांक व संबंधित अधिका—यांनी मराठी भाषेच्या वापरासाठी केलेली कामे इत्यादी माहिती तसेच, मराठी भाषा अधिकारी पदनिर्देशित/ नियुक्त केले गेले नसल्यास, त्याची कारणे अशी सर्व माहिती समितीस उपलब्ध करून देण्याबाबत विभागास **ar.affiliation2@fort.mu.ac.in** या ईमेलवर दिनांक १० जूलै, २०२२ पर्यत कळविण्यात यावे.

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर विनंती करण्यात येते की, सदर सुचनांचे पालन करण्यात यावेत.

सही/—
(डॉ विनोद पाटील)
कुलसचिव (प्र)

मुंबई—४०० ०३२
२८ जून, २०२२

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:—**

१. कुलगूरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२
२. स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२
३. स्वीय सहाय्यक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई— ४०० ०३२

(डॉ विनोद पाटील)
कुलसचिव (प्र)

मुंबई—४०० ०३२
२८ जून, २०२२

28/06 28.6.22 28/6

विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक ०२३९ /म.वि.स./ ३.५८/ म.भा.स.
दिनांक 31 MAR 2022

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/EOD/20
05 APR 2022
285

**प्रेषक :**

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति :**

कुलसचिव,
सर्व विद्यापीठे.

**विषय :** मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचा प्रचार, प्रसार व संवर्धन करण्यासाठी, मराठी वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी दरवर्षी आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम तसेच मराठी भाषेचा कामकाजात वापर होतो किंवा कसे यासाठी मराठी भाषा अधिकारी यांनीं केलेली कार्यवाही अवगत करण्याबाबत...

**संदर्भ :** (१) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, मराठी भाषा गौरव दिन, मराठी राजभाषा दिन आणि वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यासंदर्भात मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून प्रतिवर्षी वेळोवेळी निर्गमित होणारी परिपत्रके.
(२) महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१.

**महोदय,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, मराठी भाषा समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत खालील मुद्यांची माहिती मागविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे:-

**मुद्दा क्र.१** –"आपली मातृभाषा मराठीचे वैभव जपणे, तिचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन करणे, मराठी साहित्य वाचनाची आवड वृध्दींगत करणे यासाठी शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, शासकीय संस्था/मंडळे, सार्वजनिक उपक्रम, महाविद्यालये/शाळा इत्यादी कार्यालयांनी विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत शासनस्तरावरुन दरवर्षी परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात येतात.

या सूचनांनुसार सर्व मंत्रालयीन विभागाचे सचिव, सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त, सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी व सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयामध्ये व शासकीय संस्था/मंडळे,सार्वजनिक उपक्रम तसेच सर्व महाविद्यालये/शिक्षणाधिकारी यांच्या अधिनस्त सर्व शाळांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये **मराठी भाषा जतन, प्रचार, प्रसार व संवर्धनासाठी कोणकोणत्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन केले गेले/करण्यात येते, कोणकोणत्या तज्ज्ञ,**

विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते/करण्यात येते व या कार्यक्रमांसाठी स्थानिक सन्मा.लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले होते/करण्यात येते इत्यादी सर्व तपशीलवार माहिती समितीस उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित कार्यालयांना कळविण्यात यावे.

मुद्दा क्र.२ - महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ कलम ५ब. (१) मध्ये पुढील तरतूद नमूद आहे:-

"राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय, या अधिनियमान्वये त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, सुयोग्य अधिकाऱ्यास "मराठी भाषा अधिकारी" म्हणून पदनिर्देशित करील."

**या तरतूदीनुसार पदनिर्देशित करण्यात आलेल्या "मराठी भाषा अधिकारी" यांची नावे, पदनामे, नियुक्तीचा दिनांक व संबंधित अधिकाऱ्यांनी मराठी भाषेच्या वापरासाठी केलेली कामे इत्यादी माहिती तसेच, मराठी भाषा अधिकारी पदनिर्देशित/नियुक्त केले गेले नसल्यास, त्याची कारणे अशी सर्व माहिती समितीस उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित कार्यालयांना कळविण्यात यावे.**

अत: आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या विद्यापीठाअंतर्गत सर्व महाविद्यालयांकडून उपरोक्त मुद्यांशी संबधित माहिती प्राप्त करून घेऊन, तपशीलवार माहिती सदरहू पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या आत या सचिवालयास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी**, मराठी भाषा समिती, ड-१७, १२ वा मजला, विधान भवन, मुंबई – ४०० ०३२ येथे ३० प्रतींमध्ये सादर करावी. तसेच **d17.mbs.mls@gmail.com** या ईमेल आयडीवरदेखिल उपलब्ध करुन देण्यात यावी.

**कृपया सदरहू बाब तातडीची समजण्यात यावी.**

आपला,

(स्वाक्षरी)

**( सोमनाथ सानप )**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रत:-**

१) कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पत्र पेटी क्र. ८०, उमविनगर, जळगांव - ४२५ ००१.
२ कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, कॅम्प परिसर, तपोवन गेटजवळ, अमरावती - ४४४ ६०२.
३) कुलगुरु स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.
४) कुलसचिव, यशवंत चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२२२२.
५) कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, एमआयडीसी मार्ग, गडचिरोली – ४४२६०५
६) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५
७) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४० ००१
८) कुलसचिव, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, प्रशासकीय भवन, मौदा मार्ग, रामटेक - ४४११०६ रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४० ००१
९) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, विद्याविहार, लोणेरे - ४०२ १०३, जि.रायगड.
१०) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर - ४१६००४.
११) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, विद्यापीठ परिसर, औरंगाबाद - ४३१ ००४.

१२) कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

१३) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, १, नाथीबाई ठाकरसी मार्ग, मुंबई - ४०० ०२०.

१४) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, एस.जी. मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

१५) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राज्य महामार्ग १०, राहुरी ४३१७२२ जि. अहमदनगर.

१६) कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, कृषी नगर, परभणी - ४३१ ४०२.

१७) कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली - ४१५ ७१२ जि.रत्नागिरी.

१८) कुलसचिव, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषी नगर, अकोला - ४४४ १०४.

१९) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, दिंडोरी मार्ग, म्हसरुळ, नाशिक - ४२ ००४.

२०) कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, पुतळा सरोवर मार्ग, नागपूर - ४४० ००१.

****